महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर

## Government Medical College, Chandrapur

Ramnagar , Chandrapur - 442401, Maharashtra, INDIA

Telephone No. 07172- 277104 Fax No. 07172- 277103

Website : www. gmcchandrapur.org Email – gmcchandrapur@gmail.com

जा.क्र.शावैमचं/आस्था ३/जाहिरात/३५१-५३ /२०२५ दिनांक २१/०१/२०२५

### -: जाहिरातीची सुचना :-

विषय :- कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याकरिता निव्वळ तात्पुरत्या नियुक्तीने २ मानसोपचार समुपदेशकांची पदे भरण्याबाबत

संदर्भ :- महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,शासन निर्णय क्रमांक : कंत्राटी-०६२४/प्र.क.२३५/प्रशा-२ दिनांक ०८ ऑगस्ट २०२४

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर या संस्थेत कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात २ (दोन) मानसोपचार समुपदेशकांची पदे भरण्याकरिता उमेदवारांकडून पृथक अर्ज मागविण्यात येत आहे. अर्जाचे कोरे नमुने दिनांक २३/०१/२०२५ ते दिनांक ३१ /०१/२०२५ पर्यंत वेळ १०:३० ते ५:०० पर्यंत अधिष्ठाता कार्यालय, आस्थापना विभाग वर्ग-३ येथे विहीत शुल्कासह उपलब्ध आहे. ऑफलाईन अर्ज दिनांक ०३/०२/२०२५ रोजी ६:०० वाजेपर्यत स्वीकारण्यात येतील. तद्नंतर आलेले अर्ज स्विकारले जानार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदर पदासाठी मुलाखती दिनांक १०/०१/२०२५ रोजी ठिक ३:०० वाजता अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रामनगर, चंद्रपूर कार्यालय यांचे दालनात ठेवण्यात आली आहे. अधिक माहितीकरीता सदर जाहिरात या महाविद्यालयाच्या **www. gmcchandrapur.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

या जाहिरातीमधील कोणताही मजकूर उदा. अटी,शर्ती, नियम, पदसंख्या इत्यादीमध्ये कोणतेही बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांचेकडे रोखून ठेवले आहे.

जाहिरातीतील पदांसाठी मुलाखती घेण्यात येत असून, पदाच्या उपलब्धते प्रमाणे प्रथम निवड केलेल्या उमेदवारांना नियुक्तीचे आदेश ११ महिन्यांकरिता देण्यात येतील. उमदेवारांची कागदपत्रे (जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे) परिपुर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही.

### नियम व अटी :-

१. मानधन :- मानसोपचार समुपदेशक यांना शासन निर्णय क्रमांक : कंत्राटी-०६२४/प्र.क.२३५/प्रशा-२ दिनांक ०८ ऑगस्ट २०२४ नूसार रु.३०,०००/- (अक्षरी रुपये तीस हजार फक्त) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहील. सदरील वेतन हे संस्थेच्या महात्मा जोतीबा फुले जन आरोग्य योजनेच्या निधीमधून उपलब्ध अनुदानातून भागविण्यात येईल.

२. वयोमर्यादा (दिनांक ३१/०१/२०२५ रोजी) :- किमान वय :- १८ वर्ष पुर्ण

कमाल वय :- अराखीव (खुला) -३८ वर्ष, मागासवर्गीय /आ.दु.घ./अनाथ -४३ वर्ष,

प्राविण्य प्राप्त घेळाडू - ४३ वर्ष, दिव्यांग उमेदवार -४५ वर्ष,

उमेदवार मागास प्रवर्गात असेल तर जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक राहील.

३. शैक्षणीक अर्हता :- एम.एस.डब्लु/एम.ए.(मानसशास्त्र)/कौन्सिलिंग डिप्लोमा धारण करणे आवश्यक

४. किमान एक वर्षाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

५. मेरीट गुण पी.जी. आणि यु.जी. नूसार प्राधान्य देण्यात येईल.

६. निवड करण्यात आलेला उमेदवार कार्यरत असतांना सतत गैरहजर असल्यास किंवा काम समाधान कारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती कोणतीही पुर्व सुचना न देता समाप्त करण्यात येईल.

७. मुलाखतीस उपस्थीत राहण्याकरिता कोणत्याही प्रकारचा प्रवास व दैनंदीन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही तसेच मुलाखतीस उपस्थीत राहण्याकरिता या कार्यालयामार्फत कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

८. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

९. सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाही व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील.

१०. सदर नियुक्ती ही मानधन तत्वावर होणार असल्याने निवड झालेल्या उमदेवारांना कायमस्वरुपी नियुक्तीकरीता हक्क सांगता येणार नाही.

११. मुलाखतीच्या दिनांकामध्ये बदल झाल्यास त्याबातची सूचना या महाविद्यालयाच्या **www. gmcchandrapur.org** वर टाकण्यात येईल त्याबाबत कोणत्याही उमेदवारास वैयक्तीकरित्या/दुरध्वनीव्दारे कळविण्यात येणार नाही.

१२. अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या छायांकित प्रति साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. तद्नंतर कोणतेही कागदपत्रे स्विकारले जाणार नाही.

आवश्यक कागदपत्रे - (अ) सर्व पदवी, पदवीका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतीम वर्षाची गुणपत्रिका (ब) जातीचे प्रमाणपत्र व जात जात वैधता प्रमाणपत्र (लागू असल्यास) (क) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला (ड) अधिवास प्रमाणपत्र (ई) अनुभव प्रमाणपत्र (असल्यास) (फ) पॅनकार्ड व आधार कार्डची छायाप्रत (ग) MS-CIT प्रामणपत्र इ. कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

सदर जाहिरात या महाविद्यालयाच्या **www. gmcchandrapur.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ.एम.बी कांबळे)

अधिष्ठाता

शासकीय वैद्यकीय महाविद्यलय

चंद्रपूर

प्रति,

१) मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) प्राध्यापक व विभाग प्रमुख, मानसोपचारशास्त्र विभाग, शा.वै.म. चंद्रपूर.

३) नोटीस वोर्ड करीता, शा.वै.म. चंद्रपूर.